जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८१९ दिनांक - २१/११/२०२३**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

**बेकायदेशी गावठी कट्टा व एक राऊंन्ड बाळगणा-या आरोपीस केले जेरबंद**

दिनांक २०/११/२०२३ रोजी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे दैनंदिन कर्तव्य करीत असताना पोलीस अंमलदार चेतन गोरे,महेश बारवकर,निलेश जमदाडे यांना त्यांचे बातमीदारामार्फतीने बातमी मिळाली की, नवीन हायवेवरील दरी पुलाजवळ एक इसम गावठी कट्टा घेवुन थांबला आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने लागलीच भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी जांभुळवाडी दरीपुलाचे खालील बाजुस जावुन बातमीप्रमाणे इसमाचा शोध घेतला असता तेथे इसम नामे **विजयकुमार तुळशीराम शिंदे, वय ३१ वर्षे, धंदा गवंडीकाम, रा. भुगाव, माताळवाडी फाटा डोंगरे यांचेकडे भाडयाने, ता.मुळशी, जि.पुणे** हा त्याचे ताब्यात एक ४०,०००/- रुपये किंमतीचे गावठी बनावटीचे पिस्टल व २००/- रुपये किंमतीचे १ जिवंत काडतुस असा एकुण ४०,२००/- रुपयांचे मुद्देमालासह मिळुन आल्याने ते जप्त करण्यात आले.

सदर आरोपी विरुध्द भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ७५३/२०२३,भारतीय हत्याराचा अधिनियम कलम ३ सह २५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) (३) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करुन त्यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग, पुणे श्री. प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विनायक गायकवाड,तसेच पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय पुराणिक, गिरीश दिघावकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ, पोलीस उपनिरीक्षक धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार चेतन गोरे, महेश बारवकर, सचिन सरपाले, निलेश जमदाडे, शैलेश साठे, निलेश ढमढेरे, मंगेश पवार, हर्षल शिंदे, अवधतु जमदाडे, अभिजीत जाधव, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, निलेश खैरमोडे, आशिष गायकवाड, अभिनय चौधरी, राहुल तांबे, विक्रम सावंत यांच्या पथकाने केली आहे.


पुणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे
दुरध्वनी क्रमांक: ०२०-२४३६५१००
महाराष्ट्र पोलीस
पुणे पोलीस
भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन
पुणे शहर